# प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेकरिता करारावर सागर मित्र नियुक्तीसाठी जाहिरात

## (जिल्हा :- मुंबई उपनगर)

सागरी जलक्षेत्राचा पुरेपूर वापर करून मत्स्योत्पादनात वाढ करणे, मूल्यवर्धन व निर्यातमूल्यात वाढ करणे, जलक्षेत्राची सरासरी उत्पादकता वाढविणे आणि काढणीपश्चात नुकसान कमी करणे, याद्वारे एकुणच राष्ट्रीय दरडोई उत्पादनात वाढ करणे. याकरिता केंद्र शासनाने महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना मंजूर केली आहे. सदर योजनेच्या सुसुत्रीकरण व समन्वयाकरिता मुंबई उपनगर ह्या सागरी जिल्ह्यामध्ये ''सागर मित्र'' या अभिनामानी ०२ पदे ११ महिने या कालावधीकरिता (परत मुदतवाढीच्या तरतुदीसह) निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरावयाची असून त्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

**उमेदवाराची पात्रता, अटी व शर्ती खालीलप्रमाणे:-**

**४. अनिवार्य शैक्षणिक अर्हता-:**

- 12th science, Diploma Fisheries, Bachelor's degree in Fisheries Science/ Marine Biology/Zoology
- माहिती तंत्रज्ञान व संगणक प्रणालीबाबतचे अद्ययावत ज्ञान आवश्यक. (MS-CIT/ PG Diploma in IT)

**प्राधान्य :-**

- पदव्युत्तर पदवीधारक जसे M.F.Sc.
- स्थानिक भाषांचे ज्ञान (कोळी / मालवणी/कोकणी. उदा)
- स्थानिक ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या उमेदवारांस सर्वोच्च प्राधान्य.

५. **वय :-** अर्जदाराचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

६. **कामाचे स्वरूप:-**

- मत्स्यव्यवसाय विभाग व मच्छी मार यामधील समन्वयक बनणे.
- स्थानिक लोकांमध्ये मत्स्यव्यवसाय विषयक जागरूकता निर्माण करणे.
- काढणीपश्चात व्यवस्थापन, मासळी विक्री उपक्रम तसेच पर्यायी उपजीविकेच्या साधनांच्या आधारे महिला सबलीकरण करणे.
- मच्छीमारांना तांत्रिक प्रशिक्षण घेण्याकरिता प्रोत्साहित करणे. योजनेंतर्गत लाभार्थ्यांना तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) बनविण्यास मदत करणे.

६. **दरमहा एकत्रित मानधन-:** रु. १००००/- (उल्लेखनीय / उत्कृष्ट कामास अतिरिक्त मानधन रु. ५०००/- अनुज्ञेय राहील)

७. **कामाचे ठिकाण :** मुंबई उपनगर जिल्ह्यातील सागर मित्र नेमणुकीसाठी गावांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.
१. पातवाडी. २. जुहू तारा

याबाबतची अधिक माहिती http://nfdb.gov.in/>http://nfdb.gov.in/guideline या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

इच्छुक अर्जदारांनी अनिवार्य शैक्षणिक पात्रता, वय (जन्मतारीख) रहिवास व अनुभवाचा पुरावा तसेच संपर्क ई-मेल व दूरध्वनी क्रमांकासह आपला अर्ज दिनांक- १२/०६/२०२३ या तत्पूर्वी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाच्या पत्त्यावर न पाठविता फक्त खाली दिलेल्या ई-मेलवर सादर करावा. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाचा ई-मेल ॲड्रेस पुढीलप्रमाणे आहे.

**मुंबई उपनगर - sagarmitra.mumsub@gmail.com**

**कार्यालयाचा पत्ता:-** सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (ता), मुंबई उपनगर यांचे कार्यालय सातवा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, चेतना कॉलेजसमोर, शासकीय वसाहत, बांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१

प्राप्त अर्जांची छाननी करून, पात्र उमेदवारांना त्यांनी दिलेल्या ई-मेलवर मुलाखतीची तारीख, स्थळ व वेळ याबाबत कळविण्यात येईल. मुलाखातीसाठी येताना सोबत शैक्षणिक अर्हता, अनुभवाचा दाखला, रहिवासी पुरावा तसेच इतर तांत्रिक स्वरुपाचे प्रशिक्षण घेतले असल्यास त्याबाबतची सर्व मूळ प्रमाणपत्री सोबत आणावीत.

**विशेष नोंद :**

१. सागर मित्र नियुक्ती ही योजना कालावधीसाठी निव्वळ तात्पुरती नियुक्ती असून, योजना संपल्यावर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल, तसेच या आधारे अर्जदारास भविष्यात शासकीय नोकरीचा कोणताही दावा करता येणार नाही.

२. मुलाखातीसाठी येण्या-जाण्याचा या तत्सम कोणताही भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

डीजीआयपीआर / २०२०-२०२१/१२०२

सही/-
**(डॉ. समता शितुत)**
**सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,**
**मुंबई उपनगर**

डीजीआयपीआर/२०२३-२४/११६४